



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ८२ वा | रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# जी डी बापू तुम्ही रडू नका, तुमचा शरद भरकटलाय !

**दत्तकुमार खंडागळे**
**मो.9561551006**

सध्या सांगली जिल्ह्यातल्या नेत्यांनी भाजपसमोर नांग्या टाकत कमळीची वाट धरली आहे. जिल्ह्यातले अनेक नेते भाजपात जात आहेत. आपली मुळची परंपरा, विचारधारा आणि वारसा गुंडाळून अनेकांनी भाजपाची वाट धरली आहे. ज्या जिल्ह्याने नेहमीच पुरोगामी विचारधारा जपली. पुरोगामी विचार वाढवला व जोपासला त्याच जिल्ह्यातले अनेक नेते कमळाबाईच्या बाहूपाशात विसावू लागले आहेत. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी बापू लाड, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व देशाचे उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री व क्रांतिकारक वसंतराव दादा पाटील यांचा हा जिल्हा. या जिल्ह्याचा राज्याच्या राजकारणावर अनेक वर्षे प्रभाव राहिला. गेली दहा-अकरा वर्षे वगळता सातत्याने राज्याच्या मंत्रीमंडळात सांगलीचा वरचष्मा राहिला आहे. इथल्या लोकांनी पुरोगामी विचार नेहमीच जोपासला. गांधी, नेहरूंचा मार्गच या लोकांनी प्रशस्त केला. आज त्याच सांगली जिल्ह्यातले अनेकजण "संघम शरणम् गच्छामी" म्हणत भाजपात जात आहेत. परवा क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांचे नातू व राष्ट्रवादीचे पदवीधर आमदार अरूण लाड यांचे चिरंजीव शरद लाड यांनीही भाजपाची वाट धरल्याची धक्कादायक बातमी समजली. गेल्या पाच दहा वर्षात अनेकांनी भाजपाची वाट धरली पण फारसं काही वाटलं नाही. पण जी. डी. बापूंच्या नातवाने भाजपाची वाट धरणे वेदनादायी आहे. आयुष्यभर ज्या माणसाने कधीच विचारांची तडजोड केली नाही. हयातीत कधी डावा विचार सोडला नाही. त्या माणसाच्या नातवाने भाजपात जावे यासारखे लाजिरवाणे ते काय असू शकते ? क्रांतिसिंह नाना पाटलांनी स्थापन केलेल्या प्रती सरकारच्या तुफान सेनेचे प्रमुख असलेल्या जी. डी. बापूंनी सत्तेसाठी कधीच वैचारिक व्यभिचार केला नाही. कधी सत्तेला शरण जात गुडघे टेकले नाहीत. त्याच जी. डी. बापूंचा नातू भाजपात जातो हे धक्कादायक आहे. खरेतर बापूंच्या नातवाने बापूंचीच केलेली ही विटंबना आहे. हे चित्र पाहून बापूंचा आत्मा रडत असेल. आयुष्यभर आपण काय जगलो आणि आपले वारसदार कसे निघाले ? हा प्रश्न बापूंच्या आत्म्याला बोचत असेल. बापू ढसा ढसा रडत असतील. त्यांना या गोष्टीचं खुप दुःख झालं असेल. म्हणूनच, "जी. डी बापू तुम्ही रडू नका, तुमचा शरद भरकटलाय !" असं सांत्वनपर सांगाव वाटतं. पण अशा सांत्वनाने जी. डी बापूंच्या वेदना कमी होतील काय ? हा ही प्रश्न आहे.

कमळाबाईच्या सत्ता सौंदर्याला बापूंचा नातू भुलला की कुणा असंगाशी संग झाला म्हणून त्याने ही वाट धरली ? असे अनेक प्रश्न बापूंना पडत असतील. आज जर जी. डी. बापू असते तर कदाचित बापूंनी लाडक्या शरदचा कान पकडला असता किंवा एखादी कानफटात नक्कीच लगावली असती. भरकटलेल्या शरदला बापूंनी आपला वारसा काय आणि तु करतोस काय ? असा सवाल करत भानावर आणलं असतं. बापूंना हा धक्का सहन झाला नसता. आजवर अनेक मोठ-मोठ्या लोकांचे वारसदार पोकळ बांबूसारखे निघाले आहेत. हे सगळे वारसदार मोठ्या माणसाच्या, महापुरूषांच्या रक्ताचे, त्यांच्या संपत्तीचे जरूर वारस आहेत पण त्यांच्या विचारांचे वारसदार नाहीत. फार कमी वारसदार विचारांची संपत्ती टिकवून आहेत. आजवर कुंडलच्या लाड घराने जी. डी बापूंच्या विचारांची संपत्ती जोपासली होती. टिकवून ठेवली होती. पण शरद लाडांनी भाजपाची वाट धरत त्या संपत्तीची धुळधाण केली आहे. आपण केवळ जी. डी बापूंच्या संपत्तीचेच वारस आहोत हे त्यांनी दाखवून दिले. त्यांनी जी. डी बापूंची संपत्तीच आपली आहे, त्यांच्या विचारांशी आपले देणेघेणे नाही हे सिध्द केले. आपणही इतर वारसदारांसारखेच पोकळ बांबू आहोत हे त्यांनी दाखवून दिले आहे. कुणाचा विचार काय असावा ? कुणी कुठल्या पक्षात जावं ? कुठल्या संघटणेत जावं ? याचं ज्याला त्याला स्वातंत्र्य आहे. शरद लाडांनी खुषाल कुठल्याही पक्षात जावे. या निर्णयाचा त्यांना पुर्ण हक्क व अधिकार आहे पण जी. डी बापूंसारख्या माणसाचा वारसा सांगायचा तर तो विचारही जपला पाहिजे. त्यांचा विचार डावलून, मारून वारस म्हणून मिरवण्याचा तुम्हाला नैतिक अधिकार नाही. तुम्हाला त्यांचा विचार नको असेल तर त्यांचे नाव घ्यायचाही अधिकार तुम्हाला नाही. शरद लाडांनी आता क्रांति कारखान्याचे नाव बदलून गोळवळकर, हेगडेवार किंवा भिडे सहकारी साखर कारखाना असे नामकरण करायला हरकत नाही. कारखाना **(पान 2 वर..)**

## सोलापूरात पोलिसांचे निर्बंध झुगारून भाजपाची रॅली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** शहर पोलिसांनी कायदा व सुव्यवस्थेसाठी दुचाकी रॅलीवर निर्बंध घातले आहेत. तरीपण, सत्ताधारी भाजपच्याच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पोलिसांना निर्बंध झुगारून रॅली काढली. अशोक चौक परिसरातून रॅली विमानतळापर्यंत निघाली. सोलापुरातील एका सत्ताधारी आमदाराने बाईक रॅली निघणारच, अशी ठाम भूमिका घेतल्याने पोलिसांचा नाइलाज झाल्याचे बोलले जात आहे. सोलापूर-मुंबई विमानसेवेचा बुधवारी (ता. १५) शुभारंभ झाला. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पालकमंत्री जयकुमार गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी शक्तीप्रदर्शन दिसावे म्हणून शहर मध्य मतदारसंघातील भाजपच्या काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दुचाकी रॅली काढली. रॅली शांततेत निघाली, पण पोलिसांची परवानगी नसताना ती काढण्यात आली होती. सत्ताधारी आमदारांनी व भाजपच्या काही वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना रॅली काढण्यासाठी बळ दिले. त्यामुळे ही दुचाकी रॅली काढण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## हातगाडे, बेशिस्त रिक्षांमुळे शहरात वाहतूक कोंडी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात वाहतूक पोलिसांचे दक्षिण व उत्तर असे दोन विभाग आहेत. वाहतूक नियमन सुरळीत रहावे, रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून ठिकठिकाणी अंमलदार नेमले जातात. मात्र, ज्या ठिकाणी नियमित वाहतूक कोंडी होते, तेथे एकही अंमलदार नसतो. रस्त्यांलगत उभ्या वाहनांमुळे सोलापूर शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होऊ लागल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

सोलापूर शहरातील प्रवासी रिक्षांची संख्या सध्या ३५ हजारांवर पोचली आहे. ग्रामीणचे परमीट असलेल्या रिक्षा शहरातील रस्त्यांवरून धावतात. प्रवाशांची ने-आण करणाऱ्या शेकडो रिक्षा अनफिट आहेत. रिक्षांसाठी ठिकठिकाणी थांबे निश्चित करून दिले आहेत. तरीदेखील प्रवासी ज्याठिकाणी दिसेल तेथे अचानक थांबण्याचा गंभीर प्रकार शहरात सुरू आहे. दुचाकीस्वार, कारचालक रस्त्यांलगत वाहने उभी करून इतरत्र जातात. त्यात रिक्षांची गर्दी, वाहनांची वाढलेली संख्या आणि वाहतूक अंमलदार नसल्याने सोलापूर शहरातील मुख्य एसटी स्टॅण्ड ते नवीवेस पोलिस चौकी, या रस्त्यावर मुंबई-पुण्यात असल्याचा अनुभव वाहनधारकांना येऊ लागला आहे. मंगळवार बाजार-टिळक चौक-कन्ना चौक आणि सराफ बाजार परिसर, जिल्हा परिषद ते बेगम पेठ या रस्त्यांवरही अशीच स्थिती आहे.

### वाहतूक कोंडीची 'ही' प्रमुख ठिकाणे

छत्रपती शिवाजी महाराज चौक, टिळक चौक, नवीवेस पोलिस चौकीसमोर, नवीपेठ, बेगम पेठ, जिल्हा परिषदेजवळील पूनमगेट, सराफ बाजार, रंगभवन चौक ते सिव्हिल चौक, सिव्हिल चौकातून जेलरोड पोलिस ठाण्याकडे जाणारा रस्ता, रेल्वे स्टेशनसमोर, आसरा चौक, आसरा पूल उतरून डी-मार्टकडे जाताना, धर्मवीर संभाजी तलावापासून पुढे शासकीय आयटीआयपर्यंतचा रस्ता, याठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी होत आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज चौकात नेहमीच कोंडी

शहरातील मुख्य एसटी स्टॅण्डसमोरील हातगाडे, प्रवाशांची वाट पहात थांबलेली वाहने आणि एका लेनवर उभारलेल्या शहरातील रिक्षांमुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकात नेहमीच वाहतूक कोंडी होत होती. पण, आता एसटी स्टॅण्डमधून बाहेर पडणाऱ्या बसगाड्या चौकाला वळसा घालून जात असल्याने सकाळ, दुपार, सायंकाळ अशा तिन्ही सत्रात तेथे वाहतूक कोंडी होत आहे. अक्षरशः पादचाऱ्यांना ये-जा करायला सुद्धा रस्ता शिल्लक नसतो.




## संपादकीय

# खरे लाभार्थी वंचितच!

नागरिकांच्या भल्यासाठी सरकार काम करते. त्यांनी तसे करावे म्हणून नागरिकच आपले सरकार निवडत असतात. निवडणुकांच्या वेळी मोठा बाजार मांडला जातो. विविध योजनांचे आमिष मतदारांना दाखवले जाते. पूवीर्पासून हा ट्रेंड आहे. आता सगळेच राजकीय पक्ष निवडणुकीला सामोरे जाताना थेट आर्थिक लाभाची आश्वासने देतात. सत्तेत आल्यावर ती पाळण्याचा प्रयत्नही केला जातो. त्यात मोठा बोजा सरकारच्या तिजोरीवर पडत असतो, मोठी आर्थिक उलाढाल होत असते. या सगळ्यात होते असे की ज्यांच्या कल्याणासाठी आपण योजना आणली किंवा राबवतो आहे अथवा निधी जारी करतो आहे तो प्रत्यक्षात त्या पात्र व्यक्तींकडेच पोहोचतो आहे का हे पाहायचे राहून जाते. किंवा असेही म्हणता येईल योग्य व्यक्तीलाच ती मदत मिळावी, दुर्सया कोणी गैरफायदा घेऊ नये यासाठी जी दक्षता घेतली जायला हवी ती घेतली जात नाही. त्यामुळे योजनेचा हेतू चांगला असला तरी बहुतेक वेळ तो सफल होत नाही किंवा त्याचे अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. यात एका अथार्ने निधी वायाच जातो अथवा त्याचा दुरूपयोग होतो. ज्यांच्यासाठी योजना सुरू केली असते त्यांच्याच हाती काही लागत नाही आणि ते वंचितच राहतात. याच कारणास्तव सरकारच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना अपयशी ठरतात आणि कोणताही बदल होत नाही. अंमलबजावणी करणार्या अधिकार्यांचा बेजबाबदारपणा किंवा निष्काळजीपणा तसेच यंत्रणेवर अखेरपर्यंत देखरेख ठेवण्यासाठी असायला हव्या अशा यंत्रणेचा अभाव ही यामागची खरी कारणे आहेत. शेतकर्यांच्या मदतीसाठी सुरू करण्यात आलेल्या 'प्रधानमंत्री किसान सन्मान याजने'चेही तेच झाले आहे. गरजू शेतकर्यांना थोडासा हातभार लागावा हा योजनेचा उद्देश पण; ज्यांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला आहे त्यांनी बनवेगिरी केल्याचेच उघड झाले आहे.

योजना अशी होती की शेतकरी कुटुंबातील एकाच सदस्याला त्या अंतर्गत त्याच्या खात्यात थेट पैसे जमा होतील. मात्र आता केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालयाने जी तपासणी केली आहे त्यात असे आढळून आले आहे की बहुतांश लाभार्थी पती आणि पत्नी आहेत. म्हणजे एकाच कुटुंबातील पती आणि पत्नी या दोघांनी त्याचा लाभ घेतला आहे. मग प्रश्न असा निर्माण होतो की हे कसे काय घडते? निधी देताना अथवा खात्यात जमा करताना या बाबी पडताळल्या जात नाहीत का? पात्रता तपासून घेतली जात नाही का? एकीकडे कुटुंबातील दोन दोन सदस्य योजनेचा लाभ घेतात तर दुसरीकडे काही कुटुंबांना योजनेचा वाराही शिवत नाही. त्याचीही अनेक कारणे आहेत.

त्यातील सगळ्यांत प्रमुख कारण म्हणजे जागरूकतेचा अभाव. शेतकर्यांसाठीची योजना असेल अथवा अन्य कोणती, बर्याच लोकांपर्यंत त्याची थेट माहितीच पोहोचत नाही. इंटरनेटची उपलब्धता, स्मार्ट फोनची संख्या, डिजिटल व्यवहार करणाऱ्यांची संख्या असे बरेच आकडे रोज ऐकवले जातात. तथापि, ग्रामीण भागात, दुर्गम भागात खरेच एखादी योजना पोहोचली आहे का, तिची माहिती लोकांना समजली आहे का हे कधीच समजत नाही. कोणत्या योजना आहेत हेच माहिती नसेल तर त्याचा लाभ घेणार तरी कसा? खरे लाभार्थी असे अज्ञानात असल्यासारखे बोगस लाभार्थी त्याचा फायदा घेतात. त्यात वरपासून खालपर्यंत एक साखळीच निर्माण होते.

बर्याचदा योजनांसाठीची अर्ज प्रक्रियाही जटील स्वरूपाची असते. सरकारी काम म्हणजे केवळ कागदपत्रे गोळा करण्यातच सगळा उत्साह संपवून टाकला जातो. प्रत्येक कागदासाठी चकरा माराव्या लागणे हेही त्यात अपेक्षितच असते. अशिक्षित आणि गरीब लोकांसाठी हे सगळे भाकरी नको पण कुत्रं आवर असे म्हणण्याची वेळ यावी एवढे कष्टप्रद असते. या कागदपत्र पूर्ततेच्या किंवा जमवाजमवीच्या प्रत्येक टप्प्यात भ्रष्टाचारही असतोच. दाम दिल्याशिवाय काम होत नाही. स्वतःला पूर्ण आणि तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे मध्यस्थांची मदत घ्यावी लागते आणि त्यांचेही हात ओले करावे लागतात.

बहुतेक वेळा हे वेगळीच टूम काढून आपले उखळ पांढरे करून घेतात. ज्याला मदतीची खरेच गरज असते तो याचक म्हणून दाराबाहेर ताटकळतच उभा राहतो. प्रगतीशील भारताचा चेहरा दाखवण्याच्या प्रयत्नात किंवा लाभाथीर्ला थेट मदत मिळावी, मध्येच कोणी पैसे हडप करू नये या उद्देशाने सरकारने बहुतेक योजनांचा निधी थेट बँक खात्यात जमा करण्याचा प्रकार सुरू केला आहे. मात्र याकरताची जी अगोदरची पायरी आहे ती सगळी ऑनलाइन किंवा तांत्रिक स्वरूपाची असल्यामुळे अनेकांना तेथेच ठेच लागते आणि तेच वंचित राहतात आणि लाभ तंत्रकुशल व्यक्तीच्या किंवा व्यक्तीसमूहाच्या पदरात जाऊन पडतो. लाडकी बहीण असो की शेतकऱ्यांच्या विम्याची योजना असो या सगळ्यांत हीच गफलत झालेली दिसते.

मदतीसाठी सुरू केल्या गेलेल्या सर्व योजना कागदावर चांगल्याच असतात. त्याबाबतीत दुमत असण्याचे कारणच नाही. घोडे पेंड खाते ते त्यांच्या अंमलबजावणीत. बेजबाबदारपणा, बेफिकिरी, उत्तरदायित्व निर्धारित नसणे ही त्यामागची ठळक कारणे असतात. राजकीय इच्छाशक्तीचाही अभाव दिसून येतो. निवडणुकीत लाभ होण्यासाठी आश्वासने तर दिली जातात; पण अनेकदा ती पूर्ण करण्याचा प्रामाणिक हेतू नसतो किंवा तयारी नसते. भारत हा खंडप्राय देश आहे.

प्रत्येक योजना सर्व घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचंड तयारी आवश्यक आहे. तेवढी साधनसामग्री उपलब्ध नसते हेही खरे आहे. म्हणूनच तयारी अधिक जागरूकपणे करूनच अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. योग्य देखरेख ठेवून, सर्व प्रकारच्या भेदभावांना, अप्रामाणिकपणाला फाटा देत योजना राबवल्या तरच त्यांचा हेतू साध्य होईल. अन्यथा योजनांचा ओघ पात्र लाभार्थींची वाट विसरून भलतीकडेच जात राहील.

पान १ वरून

# जी डी बापू तुम्ही रडू नका...

स्थळाजवळ क्रांतिसिंह नाना पाटलांचा व जी. डी बापूंचा पुतळा आहे. आता तिथे गोळवळकरांचा व हेगडेवारांचा पुतळा उभा करावा. कारण सत्तेच्या खेळात जी. डी बापूंचा विचार फोल ठरवला जातो आहे. त्यांनी आयुष्यभर जपलेल्या विचारधनापेक्षा वारसदारांना सत्ता सरस वाटत असेल, गोळवळकर, हेगडेवारांचे विचार मोठे वाटत असतील तर तिथे क्रांतिसिहांच्या व बापूंच्या पुतळ्यांचे महत्व काय असणार? गोळवळकरांचे बोट पकडणा-यांना बापूंचे नाव घेण्याचा अधिकार काय?

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातले जी. डी. बापू लाड यांचे योगदान मोठे आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी निर्माण केलेल्या तुफान सेनेचे ते प्रमुख होते. बापू आणि त्यांचे कुंडल गाव स्वातंत्र्याचे धगधगते कुंड होते. या माणसाने व कुंडल गावाने कधीच जातीयवादी विचाराला थारा दिला नाही. कधीच डाव्या विचारांशी दगाफटका केला नाही. आपल्या उक्तीत आणि कृतीत कधी अंतर येवू दिले नाही. कालपरवा पर्यंत हे नातं असच घट्ट होतं. एकाएकी शरद लाडांनी असा कसा निर्णय घेतला ? हा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. गेल्या दहा-बारा वर्षात सांगली जिल्ह्यात अनेकांनी "संघम शरणम गच्छामी" केले. सत्यजीत देशमुख, जयश्री पाटील वगैरे मंडळी भाजपात गेल्या याचे फार आश्चर्य नाही वाटले. इतरांची तर नावेही घ्यायला नको इतके ते सत्तापिपासू आणि सत्तालालसी आहेत. सत्तेच्या या डहाळीवरून त्या डहाळीवर माकडासारख्या उड्या ते मारणारच. त्यामुळे अशांच्या भाजप प्रवेशाचा धक्का काय म्हणून बसावा? म्हणूनच त्यांच्या भाजप प्रवेशाचा धक्का नाही बसला. त्यांच्या शरणागतीचे काहीच वाटले नाही. पण शरद लाडांचा भाजपा प्रवेश मात्र मनाला बोचून गेला. शरद लाडांनी "संघम शरणम गच्छामी" करावे ? शरद लाडांनी स्वतःच आपल्या आजोबांची लक्तरं काढावीत ? हे वेदनादायी आहे.

जी. डी बापू लाड अनेक वर्षे क्रातिसिंह नाना पाटलांच्या शेतकरी कामगार पक्षाचे उपाध्यक्ष होते. त्यानंतर ते हयातभर डाव्या चळवळीत राहिले. भारतीय कम्यूनिस्ट पक्षाचे त्यांच्याकडे महत्वाचे पद होते. हयातभर त्यांनी डावा विचार सोडला नाही. तोच विचार घेवून त्यांनी अनेक लढे लढले. सत्तेशी पंगा घेतला. त्या काळात ते कॉंग्रेसमध्ये गेले असते तर मंत्री झाले असते पण जी. डी. बापूंनी सत्तेसाठी कधीच वैचारिक व्यभिचार नाही केला. सत्तेसाठी कुणाला शरण जाणे त्यांना पटले नाही. कुंडलच्या मातीत सातत्याने जातीयवादी विचारांच्या विरूध्द जागर केला गेला आहे. समतावादी विचारांचा प्रचार-प्रसार केला गेला. असं असताना शरद लाडांना ही अवदसा कशी सुचली ? हा प्रश्न पडतो. भाजपा शरद लाडांना नेमकं काय देणार आहे ? राज्याचे मुख्यमंत्री पद, गृहमंत्री पद की सांगलीचे पालकमंत्री पद ? भाजपवाले नेमकं असं शरद लाडांना काय देणार आहेत की त्यांना बापूंच्या विचारांशी दगाफटका करावा वाटला ? हा प्रश्न मात्र कोड्यात टाकणारा आहे.

## प्रबोधन

# दीप पाजळता । अंधार पळाला

दीवाळी हा भारताचा राष्ट्रीय सण आहे. सर्व सणांमधील प्रमुख सण आहे. नावावरूनच शोध घ्यायचा तर दीप, दिवे, पणत्या, पाजळण्याचा हा सण आहे. दीपोत्सव, दीपदान, दीपविसर्जन या शब्दांतील साधारण (Common) असा जो दीप शब्द आहे, तो भेटतो बुद्धांच्या उपदेशात. गौतम बुद्ध म्हणाले, 'अत्तदीपो भव' अर्थात, आत्मदीप व्हा! एकदा श्रावस्तीमध्ये असताना तथागत भिक्खूंना म्हणाले, 'भिक्खूंनो, अत्तदीप (आत्मदीप), आत्मशरण, अनन्यशरण, धम्मदीप, धम्मशरण होऊन विहार करा!' तथागत गौतम बुद्धांच्या उपदेशाचा अर्थ स्पष्ट करताना डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, 'अत्तदीप हा माणसाला स्वतःचा कणा देणारा विचार आहे. जीवन जगण्यासाठी लायक बनवणारा हा उपदेश आहे. स्वतःच्या प्रत्येक कृतीची जणू काही स्वतःच्या प्रत्येक श्वासाची, जबाबदारी माणसाने स्वतःच घेतली पाहिजे, हे शिकवणारा. खरं तर जीवनाला प्रसन्नपणे, निर्भयपणे सामोरं जाण्याचं धैर्य देणारा संदेश आहे.'

आपलं अंतःकरण, आपलं मन, आपल्या भावना, आपली सद्सद्विवेकबुद्धी चिंतनाच्या दिव्याने प्रकाशित करणं, हे प्रत्येक सुजाण, सुबुद्ध, सुसंस्कारी माणसाचं अत्यावश्यक काम आहे. संत सोहिरोबांनी म्हटलंय, अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे! शहाणा मनुष्य प्रत्येक क्षणी मनाला जागृत ठेवतो. समोर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीतील, प्रसंगातील, घटनेतील सत्य बुद्धीच्या प्रकाशात पारखून घेण्याची क्रिया हा विवेकाचा जागर असतो. सत्यासत्याच्या निर्णयाचा अटीतटीचा सामना असतो. त्यावेळी आपला ज्ञानदीप मंद झाला, की असत्य वरचढ होतं. भारतीय समाजात अज्ञान खूप आहे. अनेकांची अंतःकरणं अंधाराने भरलेली आहेत. असे लोक रूढींच्या तावडीत सापडतात.

स्वामी विवेकानंद म्हणतात, 'दुसऱ्याच्या म्हणण्यावर विश्वास ठेवल्याने किती अनिष्ट होतं, ते मी पाहिलं आहे. माज्या देशात तर त्या विश्वास ठेवण्याचा कहर झाला आहे. जुन्या दंतकथांना अवास्तव महत्त्व दिल्याने अंधविश्वास व खुळचट समजुती बळावतात, म्हणून समस्त अंधविश्वास झुगारा. जात, कुळ, देवदेवता सारं काही नाहीसं होऊ द्या!'

चिकित्साबुद्धीचा विकास अज्ञानी माणूस घडवू शकत नाही. त्यामुळे आम्ही भारतीय बुद्धांच्या पूर्वीही अंधारात चाचपडत होतो आणि आता बुद्धांनी अत्तदीपो भव असा संदेश दिल्यावरही अंधारातूनच ठेचा खात आहोत. ह्या अंधाऱ्या वास्तवाची जाणीव आमच्या वैचारिक नेत्यांना जशी तीव्रतेने झाली, तशीच आपल्या काही सुजाण पूर्वजानांही झाली. त्यांनी कार्तिक महिन्याच्या घनांध काळोखात दीपोत्सव करून तथागतांच्या संदेशाचं वहन सुकर केलं.

दिवाळी हा सण कुणा तरी राजाने हुकूम काढला आणि सुरू झाला असं घडलं नसावं. माणूस जेव्हा छोट्या वाड्यावस्त्या करून राहू लागला, पितरांचं स्मरण करू लागला, तेव्हापासून घरातील दिवे अंगणात आले. अंगण लखलखलं. भूमातेने उदारपणे दिलेलं नवं अन्न निवांतपणाचे दोन क्षण घेऊन आलं, तेव्हा भूमी कसणाऱ्या गृहस्वामीचा गृहलक्ष्मीने दिवे ओवाळून आदर केला. आपला कृतज्ञताभाव व्यक्त केला. गृहस्वामी आणि गृहलक्ष्मीचं हे प्रेमपूर्ण भावबंधन हीच दीपोत्सवाची सुरुवात असावी. तथागतांना दीप हे अंधारावर प्रकाशाचा विजय सूचित करण्यासाठी उचित प्रतीक वाटल्यामुळेच त्यांनी आत्मदीप होण्याचा अमृतसंदेश दिला.

इडापीडा टळो, बळीचं राज्य येवो ही मंगल कामना बळीराजाची पवित्र स्मृती जागवण्याचं कार्य हजारो वर्ष करीत आली आहे आणि आजही ती कृषिसंस्कृतीवंतांच्या घराघरांत गृहस्वामींना आणि भावी वंशाधारांना ओवाळताना प्रकट होते. बळीराजा उदार होता, समतावादी होता. न्यायी होता. गोरगरिबांचा हितकर्ता होता. शोषकांना पायबंद घालणारा, उच्चनीच भावनेला अव्हेरणारा, निष्पक्ष, निलोर्भी, उदार, प्रजाहितदक्ष, कर्तव्यबुद्धीप्रेरित होता.

बळीवंश ह्या डॉ.आ.ह. साळुंखे यांच्या संशोधित ग्रंथात बळीराजाचे येणारे उल्लेख चिंतनप्रेरक आहेत. डॉ. साळुंखे लिहितात, 'बळीराजा- सात काळजांच्या आत जपून ठेवावा असा जिवलग होता. बहुजन समाजाचा श्रेष्ठ पूर्वज आणि महान नायक होता. बहुजन समाजाला सच्ची अस्मिता आणि जीवननिष्ठ संस्कृती देण्यात त्याचा वाटा फार मोठा आहे. बळी निरहंकारी आणि तत्त्वदर्शी होता. यज्ञयागापासून अलिप्त होता. लोकांना संपत्ती समान वाटणारा होता. म्हणूनच समाज त्याच्या पुनरागमनाची इच्छा आजही करीत असतो.'

बौद्ध धम्माच्या अनुयायींनी गौतम बुद्धांचा पूर्वावतार (पूर्वी होऊन गेलेला थोर पुरुष या अर्थी) म्हणून बळीराजाचा उल्लेख केला आहे. गौतम बुद्धांनी आत्मदीप व्हा असा संदेश दिला, तो बळीचं समताप्रेरक राज्य यावं म्हणूनच! दीपावलीचा दीपोत्सव हे बळीचं पुण्यपावन स्मरण आहे. हा मंगल उत्सव प्रत्येकाला चिंतनशील बनवतो. बळीची वंशपताका आपण समतावादी होऊन उन्नत करीत आहोत, की विषमताग्रस्त होऊन अवनत करीत आहोत, हे आपण बारकाईने पाहिलं पाहिजे.

जगातील सर्व थोर पुरुष चेहऱ्यावर आनंदी दिसत असले, तरी आतून खिन्न असावेत. महात्मा गांधीजींनी दिवाळीच्या दिवशी अभ्यंगस्नान करून लाडूचिवडा खाऊन फटाके उडवले नसतील. गाडगेबाबा नवे कपडे घालून नटले असतील का? छत्रपती शाहू महाराजांनी राजवाड्यावर दीपावलीच्या रोषणाईचा आदेश दिल्याची नोंद कधीतरी सापडेल का? दिवाळीच्या दिवशीसुद्धा ते निर्जन, एकांतवासी सोनतळी कॅम्पवर गार पाण्याची अंघोळ करीत असायचे. दिवाळीसारखे सण महापुरुषांना अधिकच अंतर्मुख करीत असतात. आपला मानसदीप अधिक प्रज्वलित करून ते सामाजिक विषमता, सामाजिकांची कोती आणि विकृत बुद्धी, दरिद्री लोकांच्या हालअपेष्टा आणि जगाच्या व्यथित करणाऱ्या विराट प्रश्नांसमोर होणारी आपली अगतिकता, कुचंबणा, हतबलता यांनी अक्षरशः भंडावून जात असावेत.

दिवाळीच्या दिवशी फोडणीसाठी एक पणतीभर तेल घेण्यासाठी किराणा दुकानात आलेल्या एका गरीब मुलीची कथा पु.ल.देशपांडे यांनी लिहिली आहे. तिला दहा पैशांचं खायाचं तेल हवं होतं. तिच्यापाशी होते दहा पैसे. कमीत कमी पंधरा पैशाशिवाय तेल द्यायला दुकानदार तयार नव्हता. पु.ल. म्हणतात, ह्यत्याची आणखी पाच पैशांची सोय केली. पोरीची पणती तरीही पुरती भरली नव्हती. तिच्या घरी पणतीहून अधिक मापाचं खायाचं तेल परवडत नाही.. आता पणतीचं आणि माझं नातं दिवाळीच्या रोषणाईशी होतं, ते तुटून गेलं आहे. पणत्यांची आरास पाहिली की, आमच्याकडं धाच पैसे हाइत म्हणणारी ती मुलगी-नव्हे एक प्रचंड आक्रोश मला ऐकू येतो. दिवाळीसारख्या अनेक गोष्टींची नाती तुटत तुटत मी शून्य होत जातो.'

स्वामी विवेकानंदाकडे गोरक्षा मंडळाचे कार्यकर्ते आले. स्वामीजींनी विचारलं, आतापर्यंत किती पैसा जमला?

कार्यकर्ते म्हणाले, मारवाडी व्यापाऱ्यांनी बराच पैसा दिला आहे.

स्वामी म्हणाले, मध्यभारतात भयंकर दुष्काळात नऊ लाख माणसं अन्न-अन्न म्हणत मेली. त्यांना तुम्ही काही मदत दिली?

कार्यकर्ते म्हणाले, हा दुष्काळ त्या मेलेल्या माणसांच्या कमार्चं फळ आहे. अशा लोकांना आम्ही मदत करीत नसतो. गोमाता आपली आई आहे?

स्वामीजी खेदाने म्हणाले, आपणासारखी दिव्य प्रजा आणखी कुणापोटी बरं निपजणार!

विवेकानंदानी आपला चिंतनाने तेजाळणारा आत्मदीप कधीच मंदावू दिला नव्हता. महात्मा गांधी, लोकसंत गाडगेबाबा, पुरोगामी स्वामी विवेकानंद यांचं स्मरण केल्याने दिवाळीचा सात्त्विक आनंद नक्कीच द्विगुणित होईल. कारण -

दीप पाजळता । अंधार पळाला<br>
परिसर झाला । लख्ख लख्ख ॥१<br>
आकाशदिव्यांनी । प्रकाशित झाली<br>
सदने नटली । गरिबांची ॥२<br>
दीनदुबळयांच्या । झोपड्यांच्या पोटी<br>
आगीचीच भीती । रात्रंदिन ॥३<br>
आंधळा भिकारी । झोळी चाचपतो<br>
धोंडा हाती येतो। नव्हे लाडू ॥४<br>
अश्रू पुसूनिया। भगिनी ओवाळी<br>
टिळा लावी भाळी । फुटलेल्या ॥५<br>
बळीराज्य येवो । आत्महत्या टळो<br>
पणतीत जळो । दुःखदैन्य ॥६<br>
हक्काच्या दारात । अनाथ म्हातारा<br>
म्हणे मृत्यू बरा । सणावारी ॥७<br>
अशी दीपावली । कोठे नाचतसे<br>
कोठे गाळीतसे । अश्रूधारा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**<br>
844/1, साळोखेनगर,<br>
कळंबा रोड, कोल्हापूर-416012<br>
92258 09071

## प्रबोधन

# प्रकाशाचे करा । आनंदे स्वागत

उत्सवप्रिय भारतीय मनाला दिवाळीने जितकं मोहित केलं आहे, तितके इतर कोणत्याही सणाने केलेलं नाही. म्हणूनच दसरा उजाडून कधी मावळतो आणि दिवाळी कधी येते, याची प्रतीक्षा केवळ लेकी-सुनाच नव्हे तर पोरंटोरं, म्हातारे-कोतारे, कर्तेसवरते, कारभारी-कारभारणी सारेच अधीर मनाने करीत राहातात. कवी केशवसुतांनी तर दिवाळीला राणी म्हटलं आहे. ते म्हणतात,

राजा जो धनधान्यदायक असे साचा कुबेरापरी ।<br>
त्या श्रीमंडित शारदीय ऋतुची राणी दिवाळी खरी ।<br>
रुपैश्वर्यगुणाढ्य ती जवळ ये द्याया तिला स्वागता ।<br>
सारेही शुभ योजनात गढले काही नुरो न्यूनता ॥

दिवाळीचं स्वागत करताना अशावेळी हर्ष-उत्कषार्ची परमावधी जन-मनात व्हावी आणि जिव्हाळ्याचे जिवलग भेटावेत, माया-ममतेला पूर यावा, एकमेकांचं भलं चिंतावं, हा सम्राज्ञी दिवाळीने आपणाला मुक्त हाताने वाटलेला सौख्याचा खजिना असतो. दिवाळी ही केवळ दिवे, पणत्या, आकाश कंदील लावण्यापुरतीच नसते; तर मानवी जीवनवस्त्रात भरजरी नक्षीकाम करून जीवनाचा जयकार करण्यासाठी असते. दिवाळी ऐहिक आनंदाची महापूजा आहे. मर्त्य जीव म्हणून माणसाच्या जीवनाविषयी उदासीनता दाखवणाऱ्या पारमार्थिकांचा कान पकडून आम्ही आनंदवादी कधी मर्त्य नसतो, असं ठणकावून बजावण्याची ही उचित वेळ असते, आनंद पर्वणी असते. लोकमानसात जसजसं अर्थप्रेम वाढत आहे, तसतसं लक्ष्मीपूजन गरिबांच्याही घरातून मूळ धरीत आहे. शेवटी अर्थार्जन हा पुरुषार्थ आहे, हे समाजमनावर ठसत असून ऐहिक सुखाची अभिवृद्धी हा मोक्षलाभच असतो.

कवी केशवसुतांना द्रव्यपूजेचं वावडं होतं, कारण अर्थहीन जीवन जगणारे ते शिक्षक होते. त्यांच्यामते, द्रव्य हे साधन आहे, ते साध्य नव्हे म्हणून लोकांनी साधन पूजेऐवजी साध्यपूजा करावी. ते म्हणतात,

लक्ष्मीपूजन ते द्वितीय दिवशी रात्रौ जधी होतसे ।<br>
सोने आणि वह्या धनीजन तधी मांडून अर्चितसे ।<br>
साध्याला विसरून लोक धरिती भक्ती कसे साधनी ।<br>
ये हा आशय अर्थहीन कवीच्या चित्तात ते पाहुनी ॥

आज केशवसुत जगात नाहीत. भ्रष्टाचाररूपी समुद्रातून प्रकट झालेल्या लक्ष्मीपूजनाच्या थाटामाटाने कदाचित ते भ्रमिष्ट झाले असते. आज कामातून, घामातून लक्ष्मी येत नाही. हरामाच्या लक्ष्मीची पूजा विनाशाचं संकट आणल्याशिवाय राहाणार नाही.

केशवसुतांसारखेच 'ज्ञानपीठ'कार साहित्यिक वि. स. खांडेकर हेही समतावादी होते. ते कवीही होते. त्यामुळेच तेही घरी एक पणती मिणमिणती अशी कविता लिहून दिवाळीची काळी बाजू दाखवतात. या कवितेचे निवेदक खांडेकर हेही शिक्षकच आहेत. पणती मिणमिणती आहे, याचा अर्थ, ती समाजाच्या अभावग्रस्त परिस्थितीचं दर्शन घडवते. वि.स. खांडेकर म्हणतात, अगणित बांधव बघ अंधारी। किर्र रान। भय भवती भारी। अशाही स्थितीत पणती भयमुक्तीचं आश्वासन देते. काळोखाच्या भयाण लाटा। उठती फुटती बारा वाटा ॥ या स्थितीचा सामना करते. काळोखावर, अन्यायावर, विषमतेवर मात करू इच्छिते म्हणून ती घाईने उचलून चालणार नाही. तिकडे धनिक मंदिरात दिवे आहेत, पण ते पणतीसारखे स्नेहपूर्ण नाहीत. श्रीमंती ही माणुसकीहीन, प्रेमहीन, स्नेहहीनच असते, असं कवी म्हणतात, दिवे विजेचे धनिक मंदिरी। प्रकाश पाडिती परोपरी जरी । स्नेहशून्य ते सदा अंतरी । का करशी तयांची शिरगणती ॥ अशावेळी मानवतेच्या रक्षणासाठी 'पणती'ला जपणे, तिच्या अपुऱ्या प्रकाशाची जपणूक करणे, हे मानवतावाद्यांचं कर्तव्यच आहे. खांडेकरांच्या कवितेचे समीक्षक डॉ. सुरेश जोशी लिहितात, 'जी गोष्ट धनिकांची तीच दगडी मूर्तीतच देव मानणाऱ्या सनातन्यांची आहे. त्यांच्याकडे तुपाचा नंदादीप असेल, पण तो दगडी मूतीर्ला दाखवील. जनजीवन प्रकाशमान करण्याची हिम्मत ते बाळगत नाही.' पणती मिणमिणती असूनही ती धन्य आहे. म्हणूनच, धाव म्हणून तव घेऊन पणती । हृदय नाचू दे तिच्या संगती । गोरगरिबांच्या उद्धाराचं कार्य थोर आहे. साधीभोळी गरीब माणसं कष्टकरी-कामकरी उत्साहाने या प्रकाशाकडे धावतील. त्यांच्या डोळ्यांत प्रेम, दया, माणुसकी दिसेल. कवी म्हणतात, पहा पुढे या दीन लोचनी । रविकिरणांचे स्मरण होऊनी। आशा नाचे ज्योत दुज्या क्षणी । जरी विझे कोण तरी करी क्षिती? एकदा जनमानस तेजाळलं, अंधाराला भेदून प्रकाशाने श्रांत पावलांनी मार्ग दाखवला की, पणतीच्या जीवनाची कृतकृत्यता झाली. पणतीने केलेलं हे कार्य महनीय आहे. कारण प्रासादनिवासी लक्ष्मीपुत्र त्यासाठी पुढे येणारे नाहीत किंवा दगडी मूर्ती जागची हलणारी नाही. म्हणून त्यांच्याहून ही पणती सहस्रपटीने थोर आहे. आता ही विझेल, पण तिने प्रज्वलित, प्रकाशित केलेलं मन निराश होणार नाही. काळवंडून जाणार नाही. मानवतावादी वि. स. खांडेकरांनी गायलेली ही प्रकाशगाथा दिवाळीला अधिक उज्ज्वल करणारी, युगानुयुगे प्रेरणा देणारी आहे. तेव्हा-


प्रकाशाची पूजा । करा घरीदारी ।<br>
बसावे अंधारी । कशासाठी ॥ १<br>
प्रकाशाचे करा । आनंदे स्वागत ।<br>
भय, खेद खंत । झटकूनी ॥ २<br>
प्रकाशाचे करू । चिंतन सदैव ।<br>
नातरी दुर्दैव । नाही दुजे ॥३<br>
प्रकाश हा स्वर्ग । प्रकाश हा मोक्ष ।<br>
दीपोत्सव साक्ष । देई पहा ॥४<br>
प्रकाशाचा मार्ग। असो पायांखाली ।<br>
नाही त्या वेगळी । स्वर्गवाट ॥५<br>
प्रकाशा वंदावे । प्रकाशे नटावे ।<br>
प्रकाश हे व्हावे । एक साध्य ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**<br>
844/1, साळोखेनगर,<br>
कळंबा रोड, कोल्हापूर-416012<br>
92258 09071

# फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो त्यात दिवाळी या सणाला विशेष महत्व आहे. दिवाळी सणाला सणांचा राजा म्हंटले जाते कारण दिवाळी हा एकमेव असा सण आहे जो पाच दिवस चालतो. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचाच आवडीचा हा सण आहे. या सणाचा उत्साह काही औरच असतो. या सणाइतका आनंद दुसऱ्या कोणत्याच सणात नसतो. दिवाळी सण म्हणजे दिव्यांचा सण, प्रकाशाचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या कालावधीत पणत्या, मेणबत्त्या, आकाशकंदील, नवी खरेदी, नवे कपडे, मिठाई, रांगोळी, दिवाळी अंक, धार्मिक गोष्टी, मित्र - मैत्रीणी, नातेवाईकांच्या भेटी, कौटुंबिक संमेलन आणि फटाके या साऱ्या गोष्टी आल्या. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे फटाके. फटाके आणि दिवाळी हे तर जणू समीकरणच झाले आहे. फटाक्यांशिवाय दिवाळीच साजरी होऊ शकत नाही अशी आजची अवस्था आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच फटाके उडवतात. वास्तविक दिवाळी हा दिव्यांचा सण आहे, फटाक्यांचा नाही तरीही दिवाळीत फटाक्यांना अवास्तव महत्व दिले जाते. दरवर्षी दिवाळीत फटाके उडवू नका, फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्पिणामांचा फटका केवळ मानव जातीलच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीला बसतो त्यामुळे दिवाळीत फटाके उडवू नका. फटाके उडवायचेच असेल तर हरित फटाके उडवा असे आव्हान सरकारतर्फे तसेच अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांकडून केले जाते मात्र त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते. अर्थात काही लोक त्यांच्या आव्हानास प्रतिसाद देतात मात्र त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. फटाक्यांचे समर्थन करणारे नेहमी म्हणत असतात की दिवाळीतच फटाके न वाजवण्याचे आव्हान का केले जाते? याचे कारण असे आहे की दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात. दिवाळी इतके फटाके इतर कोणत्याही वेळी वाजवले जात नाही. अधिक फटाके वाजवल्याने त्याचे दुष्परिणामही अधिक होतात. दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे प्रदूषण वाढते. आधीच आपल्या देशाची हवा प्रदूषित आहे. मुंबई - दिल्लीसारख्या शहरांच्या हवेने धोक्याची पातळी गाठली आहे त्यात जर फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली तर लोकांना श्वास घेणेही मुश्कील होईल तसे झाले तर त्याचा परिणाम केवळ मानवाच्याच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीच्या आरोग्यावर होईल. कॉपर, कँडियम, लेड, गंधक, फॉस्फरस, सल्फर, मॅग्नेशियम, सोडियम, झिंक, नायट्रेट आदी रसायनांपासून फटाक्यांची निर्मिती केली जाते. ही रसायने मानवी आरोग्यास घातक आहेत. फटाक्यातील कॉपरमुळे श्वसनमार्गात दाह होतो. त्यामुळे दम्याच्या रोगांच्या आजारात वाढ होते. हृदयविकार आणि फुफ्फुसांचे आजार होण्याची शक्यता असते. लेड मज्जासंस्थेवर परिणाम करते. कँडीयम मूत्रपिंडाचे नुकसान करते. सल्फर हे वनस्पतींसाठी घातक आहे. सल्फरमुळे वनस्पतींची वाढ खुंटते. सल्फरमुळे झाडांच्या फळावर अनिष्ट परिणाम होतो. ही फळे खाण्यात आल्यास खणाऱ्यांना विषबाधा होण्याचा धोका असतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांना खूप त्रास होतो. सतत चार ते पाच दिवस कानठळया बसवणाऱ्या आवाज ऐकल्यावर कायमचे बहिरेपणा येण्याची शक्यता असते. शिवाय फटाके फोडताना योग्य ती काळजी घेतली नाही तर अपघात होऊन कायमचे अपंगत्व येण्याची शक्यता असते. ऐन दिवाळीत फटाक्यांच्या दुकानांना किंवा कारखान्यांना आग लागून दुर्घटना घडल्याचे आणि त्यात जीवित आणि वित्त हानी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत हे देखील विसरता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार केला तर फटाके किती घातक आहेत हे लक्षात येईल. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची वेळ आली आहे. मानवी आणि सजीव सृष्टीवर परिणाम करणारे हानिकारक फटाके दूर ठेवून आपण दिवाळी साजरी केली तर वाढत्या प्रदूषणाला आळा घालता येईल शिवाय आरोग्यही चांगले राहील. चला तर मग फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या! फटाके दूर करून हा आनंदाचा सण साजरा करू या!!



**श्याम ठाणेदार**<br>
दौंड जिल्हा पुणे

## वात्रटिका

### मुखवटाधारी

पडद्यावर दिसतो तसा<br>
हिरो आयुष्यात नसतो...<br>
चारचौघात बसल्यावर<br>
तो वेगळाच बोलत असतो... ॥<br>
पायउतार झाले त्यांनी<br>
पुन्हा पायरीवर येऊ नये...<br>
भरपेट खाऊन झाल्यावर<br>
आग्रहाखातर पुन्हा जेऊ नये... ॥

**हणमंत पडवळ,**<br>
धाराशिव,<br>
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पुणे विभागात पात्र मतदारांची १०० टक्के मतदार नोंदणी करा- अपर आयुक्त तुषार ठोंबरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदार संघांच्या मतदार यादी नव्याने तयार करण्याचा कार्यक्रमाअंतर्गत ६ नोव्हेंबरपर्यंत मतदार नोंदणी करता येणार आहे, त्यामुळे विभागातील माध्यमिक शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठ तसेच शासकीय कार्यालयातील पात्र मतदारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याची कार्यवाही येत्या ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करावी, असे निर्देश अपर आयुक्त तुषार ठोंबरे यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात पुणे विभागातील पदवीधर व शिक्षक मतदार नोंदणीच्या अनुषंगाने पुणे विभागस्तरीय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण, कृषी विभागातील अधिकारी, विद्यापीठांचे कुलसचिव, महाविद्यालयीन प्राचार्य, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांकरिता आयोजित प्रशिक्षण सत्रात ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण परिषदेच्या महासंचालक वर्षा उंटवाल लड्डा, पुणे उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मीनल कळसकर, उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. अशोक उबाळे, तंत्र शिक्षण सहसंचालक डॉ. डी. व्ही. जाधव, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, अमरजीत पाटील, बाबुराव जाधव, पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी आशा उबाळे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी संगीता बांगर, विविध शैक्षणिक संस्था, विद्यापीठांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. बैठकीस सातारा, सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी, पदनिर्देशित अधिकारी आणि अतिरिक्त पदनिर्देशित अधिकारी, शैक्षणिक संस्थेचे प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

ठोंबरे म्हणाले, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार याद्या (डी - नोव्हो) तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणी सुरू आहे. सन २०२६ मध्ये पुणे विभागात पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यात होणाऱ्या पदवीधर व शिक्षक मतदार संघाकरिता निवडणुकीसाठी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार हे मतदार नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्त असून, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी आहेत. तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघांचे मतदार नोंदणी अधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रापुरते मतदार नोंदणीचे काम करीत आहेत.

सन २०२६ मध्ये होणाऱ्या पदवीधर व शिक्षक मतदार संघाकरिता निवडणुकीसाठी नव्याने मतदार यादी तयार करण्याचे काम सुरु आहे. या कार्यक्रमाअंतर्गत यापूर्वीच्या पदवीधर किंवा शिक्षक मतदारसंघाच्या मतदारयादीत नाव समाविष्ठ असले तरी आता पात्र मतदारांचे नव्याने मतदार यादीत नाव समाविष्ट करावे, असे भारत निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. मतदार नोंदणी करताना सर्व कागदपत्रांची तपासणी करुनच नोंदणी करावी. नवीन मतदार नोंदणीचे अर्ज मतदार नोंदणी केंद्रावर पुरेशा प्रमाणात उपलब्ध राहील, याबाबत दक्षता घ्यावी. मतदारांना मतदार नोंदणी करण्याबाबत आवश्यक ते मार्गदर्शन करावे. मतदार नोंदणीकरिता एक गठ्ठा पद्धतीने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याबाबत नोंद घ्यावी.

पुणे विभागात मतदार नोंदणी कार्यक्रमाबाबत पदवीधर आणि शिक्षकांना माहिती होण्याकरिता व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. शासकीय कार्यालयातील सर्व पदवीधर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नोंदणी सर्वांनी सक्रीय सहभाग घ्यावा. शिक्षण मतदारसंघाकरिता शैक्षणिक संस्थेतील केवळ शिक्षकांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्यात आल्याची खात्री करुन घ्यावी, शिक्षकेतर कर्मचारी, शिपाई यांचे नाव नोंद करु नये. मतदार नोंदणीबाबत आपल्याला शंका असल्यास पदनिर्देशित अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

मतदार नोंदणी प्रक्रिया १ जानेवारी पासून निरंतर सुरु राहणार असून यामध्येही मतदार नोंदणी करता येणार आहे. एकही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही श्री. ठोंबरे म्हणाले.

प्रशिक्षण सत्रात मतदार नोंदणीचे टप्पे, मतदार नोंदणीचे अर्ज भरताना घ्यावयाची काळजी, अजार्ची छाननी प्रक्रिया, मतदार अर्हता, शैक्षणिक कागदपत्रे, मतदार नोंदणी जनजागृती कार्यक्रम, संदर्भ परिपत्रके, शासन निर्णय, आदेश आदी बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघः मतदार नोंदणीची प्रक्रिया पार पाडताना प्रशासन, सर्व संबंधित यंत्रणा तसेच विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आदींनी समन्वय साधून काम करावे. लोकशाही बळकटीकरणाकरिता विभागातील अधिकाधिक पात्र पदवीधर आणि शिक्षकांनी मतदार नोंदणी कार्यक्रमात सक्रीयपणे सहभागी होवून आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवून घ्यावा.

# डॉ.प्राजक्ता मोहन काशिद यांना डॉक्टरेट पदवी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील डॉ.प्राजक्ता मोहन काशीद यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथून मानसशास्त्र विषयामध्ये डॉक्टरेट पदवी मिळवली असून त्यांचे सर्वत्र अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव होत आहे.



त्यांनी "A psychological study of achievement motivation and some personality factors of teenagers using social media". या विषयावर प्रोफेसर डॉ.पी.एस.बनसोडे हेड ऑफ द डिपार्टमेंट सायकॉलॉजी संगमेश्वर स्वायत्तत्त महाविद्यालय सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली मानसशास्त्र संशोधन केंद्रातून पूर्ण केले.त्यांनी १६ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या मौखिक परीक्षेनंतर विद्यापीठाकडून विद्यावाचस्पती पदवी घोषित करण्यात आली.यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मॉडर्न कॉलेज येथे कार्यरत असलेल्या डॉ.साधना नातू आणि प्रा.डॉ.वसंत कोरे चेअरमन,विद्याशाखेचे अधिष्ठाता हे बाह्य परीक्षक म्हणून उपस्थित होते. डॉ.प्राजक्ता काशिद यांनी त्यांचे वडील कै.मोहन काशिद यांचे मुलीने डॉक्टरेट व्हावे हे स्वप्न होते ते आज मुलीने पुर्ण केले आहे.त्या सध्या डॉ.प्राजक्ता काशिद या MIT विश्वशांतीगुरुकुल स्कूल कोथरूड येथे विद्यार्थी समुपदेशक (Student Counselor) म्हणून कार्यरत आहेत.त्यांच्या पीएचडीमध्ये पती सोमनाथ क्षीरसागर यांची मोलाची साथ आणि मार्गदर्शन लाभली आहे.

# कवयित्री हाफिजा बागवान लिखित सोनचाफा काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** मुळेगाव जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका कवयित्री हाफिजाबी बागवान लिखित सोनचाफा या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले.हा कार्यक्रम डॉ. शिफा यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. समीर बागबान, साहिल बागवान, तहसीन बागवान यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.सर्वांचे स्वागत कवी खाजाभाई बागवान यांनी केले.सूत्रसंचालन सैफन बागवान यांनी केले तर आभार कवयित्री बागवान यांनी मानले.

या काव्य संग्रहास प्रख्यात कवयित्री डॉ.माधुरी चौधरी यांची प्रस्तावना लाभली आहे तर पाठराखण ज्येष्ठ कवयित्री अनिसा सिकंदर शेख यांनी केली आहे. दरम्यान, कवयित्री हाफिजा यांना भारतीय मुस्लीम मराठी साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष प्रा.डॉ.ई.जा. तांबोळी, सचिव अय्युब नल्लामंदू, प्राचार्य शकील शेख,ज्येष्ठ कवी मुबारक शेख, शफी बोल्डेकर आदींनी शुभेच्छा दिल्या.

# सोलापूर महापालिकेच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या संगणक विभागामार्फत दिनांक ०१ जून २०२५ ते ३० ऑगस्ट २०२५ या कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी संगणक विभागाशी संलग्न राहून महानगरपालिकेतील विविध तांत्रिक व प्रशासकीय कामकाजात सहभाग नोंदवला. त्यांनी दिलेली सर्व कार्ये प्रामाणिकपणे, मनोभावे आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून पूर्ण केली.



या प्रशिक्षण काळात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, कायार्तील लवचिकता तसेच संघभावना प्रदर्शित करत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या कार्याचे मूल्यांकन अत्युत्तम असे करण्यात आले असून संगणक विभागाने त्यांच्या कामाचे विशेष कौतुक केले आहे.

आज या औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप सोहळा सोलापूर महानगरपालिकेचे मा. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी आयुक्त यांच्या हस्ते शासकीय तंत्रनिकेतन कॉलेज कॉम्प्युटर डिपार्टमेंट सायन्सचे राजवीर वडनाल, श्रावणी भोसले मगरुमखाने प्रणाली, चाफाकरांडे श्रद्धा, उदगीरी स्नेहा, शेख जुनैद अहमद, मुजावर सोहा फरहत सिद्रल सोनिया, रनदिवे संजीवनी, मेंदगुळे सुकन्या, दुधाणी साक्षी, फुलारी हुरीया पाटील सप्तश्रृंगी, वांजारी ओम,भोसले आदित्य, बनसोडे वैभव सिव्हील डिपार्टमेंटचे कृष्णाली मोरे, वैष्णवी कुलकर्णी, अक्षय नराल, कावेरी साका ऋषिकेश नामजी, मोहम्मद रियान शेख, अन्वय थोरात समर्थ ढेपे या सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या प्रसंगी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे नगर अभियंता सारिका आकूलवार, संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, 'विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रशासनातील तांत्रिक प्रक्रियेचा अनुभव घेतल्यामुळे त्यांच्या करिअरला निश्चितच बळकटी मिळेल. सोलापूर महानगरपालिका नेहमीच अशा शैक्षणिक व व्यावहारिक उपक्रमांना प्रोत्साहन देत राहील.'

सोलापूर महानगरपालिका विद्यार्थ्यांच्या या योगदानाचे मनःपूर्वक कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यास त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# फक्त किराणा दुकानं लुटणारा चोर निघाला स्थानिक गुंड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील किराणा दुकानधारकांत मागील चार महिन्यापासून भीतीचे वातावरण पसरले होते. फक्त किराणा दुकानधारकांना टार्गेट करणाऱ्या संशयीत चोरट्यास बार्शी शहर पोलिसांनी जेरबंद केले आहे. हा भामटा किराणा दुकानात खरेदीचा बहाणा करून गल्ल्यावर डल्ला मारण्याचा काम करत होता. मे महिन्यात बार्शी शहरातील एका किराणा दुकानधारकाच्या ९१ हजार रुपयांची चोरी केल्यानंतर पोलिसांच्या रडारवर आला होता.

बार्शी शहर पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे अखेर त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. सीसीटीव्ही फुटेज आणि फिर्यादीच्या वर्णनावरून संशयिताला पकडण्यात यश आले असून, आरोपीने चौकशीत गुन्हा कबूल केला आहे. पोलिसांच्या कारवाईमुळे शहरातील व्यापाऱ्यांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास वाढला आहे. कोर्टाच्या आदेशानुसार संशयीत चोरट्याचे नाव आणि ओळख सांगता येत नाही अशी माहिती दिली आहे.



खरेदी करण्यासाठी जायचा आणि गल्ल्यावर डल्ला मारायचा

संशयीत चोरटा हा किराणा दुकानात खरेदीच्या बहाण्याने दुकानात येत होता आणि रेकी करून जात होता. अशीच एक घटना मे महिन्यात घडली होती. ७ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता बाशीर्तील लक्ष्मीनगर येथील रहिवासी रमेश जवरीलाल बाफणा (वय ३०) यांच्या किराणा दुकानात एक अनोळखी व्यक्ती खरेदी करण्याच्या बहाण्याने आली. तेव्हा दुकानातील काउंटरजवळ ठेवलेली ९१ हजार रुपयांची रक्कम असलेली पैशांची बॅग चोरून नेली. याबाबत किराणा दुकानदार बाफणा यांनी दिलेल्या फियार्दीवरून तात्काळ बार्शी शहर पोलिस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला**

पोलिसांना तपासादरम्यान दुकानातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोराच्या वर्णनाची माहिती मिळाली. या आधारे पथकाने संशयिताची शोध मोहीम सुरू केली. अखेर, दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने उपळाई रोड, बार्शी परिसरात पेट्रोलिंग करताना संशयिताला पकडले. संशयित सीबीझेड मोटरसायकलवर तोंड बांधून संशयास्पदरीत्या फिरत असल्याचे आढळले, जे फिर्यादीच्या वर्णनाशी आणि सीसीटीव्ही फुटेजशी जुळत होते. पोलीस पथकाने तात्काळ पाठलाग करून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने नाव आणि पत्ता सांगण्यास नकार देत पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे तो पकडला गेला. पोलीस ठाण्यात आणल्यानंतर पुढील तपासात त्याने चोरीचा गुन्हा कबूल केला. आरोपीचे नाव आणि पत्ता अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही, परंतु तो स्थानिक गुंड असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

ही यशस्वी कारवाई करण्यासाठी पीएसआय उमाकांत कुंजीर, हवालदार माने, हवालदार साठे, उपनिरीक्षक मुले, हवालदार मुठाळ, हवालदार उदार, हवालदार जाधव, हवालदार पवार, हवालदार देशमुख, कांस्टेबल शेख, कांस्टेबल उघडे, आणि हवालदार भांगे यांनी मोलाची भूमिका बजावली.

# खा. शिंदे यांच्या वतीने हिळी व बबलाद येथे पूरग्रस्तांना अन्नधान्य कीट वाटप

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अलीकडील अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबांच्या मदतीसाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने अक्कलकोट तालुक्यातील हिळी आणि बबलाद या गावांमध्ये अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. पूरग्रस्त कुटुंबांना या कठीण काळात दिलासा देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



या वाटप उपक्रमादरम्यान गावकऱ्यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सातलिंग शटगार, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, पद्मिनी शेट्टीयार, शिल्पा चांदणे, कामना बरगाले, सिद्धू डोळे, व्यंकटेश बाके, हनुमंतराव पाटील, सचिन याबाजी, अमोघसिद्ध पुजारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# घराणेशाहीला सुरंग लावण्यासाठी शिवश्री राऊतांचे रणशिंग

**कोंडी (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजाच्या हक्कांसाठी आणि संभाजी ब्रिगेडच्या प्रखर विचारसरणीसाठी काम करणारे कार्यकर्ता शिवश्री सोमनाथ राऊत यांनी आता थेट जिल्हा परिषदेच्या रणांगणात उतरायचा निर्णय घेतला आहे. 'मी घराणेशाहीला सुरंग लावण्यासाठी येतोय, फक्त तुमचा आशीर्वाद हवा', असे सांगत त्यांनी जनतेपुढे आपले स्पष्ट व लोकाभिमुख ध्येय जाहीर केले आहे.

सोमनाथ राऊत हे गेल्या अनेक वर्षांपासून मराठा आंदोलन, शिक्षण, आरक्षण व सामाजिक न्यायासाठीच्या चळवळींमध्ये सक्रियपणे कार्यरत आहेत. समाजातील वंचित घटकांचा आवाज शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी सातत्याने लढा दिला आहे. तसेच संभाजी ब्रिगेडच्या तत्त्वज्ञानावर आधारित सामाजिक परिवर्तनाचा विचार जनतेपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे.

आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत उतरून ग्रामविकास, पारदर्शक कारभार आणि सर्वसामान्य जनतेचा सहभाग असलेले लोकशाही प्रशासन उभे करणे हे त्यांचे मुख्य ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

राऊत यांनी पुढे म्हटले की, 'आज राजकारण काही मोजक्या घराण्यांच्या ताब्यात गेले आहे. कार्यकर्त्यांच्या कष्टांवर घराणेशाही फोफावत आहे. आता या व्यवस्थेला खऱ्या अर्थाने



पर्याय उभा करण्याची वेळ आली आहे. मी कोंडी गटातून उमेदवारी जाहीर करीत असून, मला फक्त जनतेचा आशीर्वाद हवा आहे. बाकी सगळं मी जनतेच्या विश्वासाने लढणार आहे.'

स्थानिक स्तरावर तरुणांमध्ये व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये राऊत यांच्या उमेदवारीबाबत चांगली चर्चा रंगू लागली आहे. मराठा आंदोलनातील त्यांचे योगदान आणि संभाजी ब्रिगेडच्या विचाराशी असलेली बांधिलकी यामुळे 'सामाजिक न्याय आणि परिवर्तनाच्या राजकारणाला नवी दिशा मिळू शकत' असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

आगामी काही दिवसांत राऊत जनतेशी संवाद साधण्यासाठी 'घराणेशाहीला सुरंग लावा - जनतेचा आवाज बना' या अभियानांतर्गत दौरा सुरू करणार आहेत.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109


(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत- गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक- ** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो ४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता -*** सिन्हा ५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे १५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते १६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर-** आर्मस्ट्राँग २५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस २७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

## सुडोकु - 82

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | | | 6 | 9 |
| | | 3 | 2 | | | | 8 | 1 |
| | | | 6 | | | 4 | | |
| 1 | 5 | 7 | | | | 6 | 9 | |
| | | | | 7 | | 8 | | 2 |
| 2 | | 4 | | 1 | 6 | | | |
| 5 | | | | | 3 | 7 | 2 | 8 |
| 6 | | 2 | 8 | 9 | 4 | | 3 | |
| 8 | 3 | 1 | 5 | 2 | | | 4 | |

# प्रभाग 20 व 21 मध्ये दिवाळीचा आनंद वाटला



**सोलापूर (कटूसत्य वृत):-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि ताज सोशल ग्रूपच्या वतीने प्रभाग क्रमांक 20 व 21 मध्ये दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर एक सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत सुमारे 160 बंधू-भगिनींना दिवाळी फराळाचे कीट वाटप करण्यात आले, तसेच ज्येष्ठ नागरिकांना आधार काठ्यांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेसचे निष्ठावान नेते तौफिक भाई शेख यांनी केले. त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्य जपत, सामाजिक सलोखा जपण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार आणि प्रदेश उपाध्यक्ष किसनभाऊ जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष संतोषभाऊ पवार, कार्याध्यक्ष जुबेरभाई बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसनभाऊ जाधव यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी अजितभाऊ बनसोडे, प्रदेश सचिव इरफान भाई शेख, नुरूदीन भाई मुल्ला, आसिफ राजे, तौसीफ सगरी, शाहिद फूप्पा, ताज पेंटर, असलम शेख, ताहेर शेख, इस्माईल शेख, शंकर भाई, टिंकू शेख तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला पदाधिकारी कविता पाटील आणि त्या भागातील मान्यवर ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे प्रभागातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, तौफिक भाई शेख यांच्या समाजाभिमुख कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# स्वामी विवेकानंद प्रशालेच्या व्हॉलीबॉल संघाची राज्य स्पर्धेसाठी निवड




**पुणे (कटूसत्य वृत):-** इंदापूर, जिल्हा पुणे येथे दि.15 व 16 ऑक्टोबर या कालावधीत पुणे विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत सोलापुरातील एमआयडीसी परिसरातील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या 14 वर्षाखालील मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले. या विजयामुळे राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी प्रशालेचा संघ पात्र ठरला.

या संघास प्रशिक्षक मा. खंडू शिंदे, गणपती कोळी, वेदांत तलकोकुल व क्रीडाशिक्षक मा. सुभाष माने यांचे मार्गदर्शन लाभले.

या विजेत्या संघाचे नॅब संस्थेचे संस्थापकअध्यक्ष माजी आमदार मा.प्रकाशजी यलगुलवार, जनरल सेक्रेटरी के.डी.पाटील, उपाध्यक्ष अनुगीता पवार, जनरल सेक्रेटरी मा.शशीभूषण यलगुलवार, सहसेक्रेटरी मा.सीमा श्रीगोंदेकर व मुख्याध्यापक मा.डॉ.हणमंत नारायणकर यांनी अभिनंदन केले.

# स्काऊट गाईड तर्फे पूरग्रस्तांना शंभर किट वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर जिल्हा स्काऊट गाईड तर्फे 'चला पूरग्रस्तांची दिवाळी गोड करु' या उपक्रमांतर्गत शंभर शेतकऱ्यांना किट वाटप करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने अनेक कुटुंबाचे,सामान्य जनतेचे शेतकऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान झाले त्यांना आधार देण्यासाठी व पूरग्रस्तांची दिवाळी गोड करण्यासाठी सोलापूर भारत स्काऊट गाईडने हा उपक्रम हाती घेतला व विविध शाळेने सहभाग घेऊन उत्तम सहकार्य केले.

पूरग्रस्तांना साखर, रवा, तांदूळ, गहू, तेल, डाळ, चुरमुरे, मोती साबण, सुगंधी उठणे, सुगंधी तेल, चहापत्ती, कोलगेट, सोलापुरी चादर अशा १६ वस्तूंची किट देण्यात आली. मौजे गुंजेगाव, कामती, पाथरी येथील पाटील वस्ती, बंडगर वस्ती, घोडके वस्ती,यमगर वस्ती, धोडमिसे वस्ती, हराळे वस्ती राठोड वस्ती आदी ठिकाणी अन्नधान्याची किट वाटप करण्यात आले.

या उपक्रमात श्री स्वामी समर्थ प्रशाला अरळी,ज. रा. चंडक प्रशाला बाळे, राजराजेश्वेरी प्राथमिक व माध्यमिक प्रशाला, विनायक नगर, मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे वस्ती, श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला बाळीवेस, राजर्षी शाहू विद्यालय विडी घरकूल, प्राथमिक आश्रम शाळा देगाव, नूतन प्रशाला कुर्डूवाडी, एस.व्ही.सी. एस. हायस्कूल होटगी,निर्मलाताई ठोकळे प्रशाला सोलापूर,राष्ट्रमाता इंदिरा गांधी मोहोळ, माध्यमिक विद्यालय वडवळ, जिजामाता प्रशाला कोंडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ओपन ग्रुप अशा विविध शाळेने या उपक्रमात सहभाग घेऊन अन्नधान्याचे किट दिले.

यावेळी जिल्हा स्काऊट संघटक श्रीधर मोरे, जिल्हा गाईड संघटक अनुसया शिरसाट, स्काऊटर महेश कोरे, जितेंद्र डहाळे, विजय क्षीरसागर, गाईडर विजयालक्ष्मी माळवदकर, भाग्यश्री कलबुर्गे, तानाजी क्षिरसागर तसेच रोवर सागर गुरव, कुशल घागरे, वैभव कोरे, मल्लिनाथ मुचडे, इरकल, गणेश माळगे व कार्यालयीन कर्मचारी रिजवाना पठाण, अमोल राठोड, बंडू बडगर आदींनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन किट वाटप केले.

'चला पूरग्रस्तांची दिवाळी गोड करू' हा उपक्रम सोलापूर भारत स्काऊट गाईडने प्रभावीपणे राबविल्याने प्राथमिक शिक्षणाधिकारी तथा जिल्हा मुख्य आयुक्त कादर शेख साहेब व जिल्हा आयुक्त स्काऊट तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक सचिन जगताप, जिल्हा आयुक्त गाईड तथा उपशिक्षणाधिकारी प्राथमिक रूपाली भावसार, जिल्हा चिटणीस तथा उपशिक्षणाधिकारी माध्यमिक विठ्ठल ढेपे,जिल्हा कोषाध्यक्ष तथा लेखाधिकारी वाळवेकर व अन्य अधिकारी वर्ग आदींनी किटची पाहणी करुन सर्व स्काऊटर व गाईडचे अभिनंदन केले.



**निरामय पॅरालिसिस सेंटर**

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अ‍ॅण्ड फिजिओथेरपी सेंटर

ISO 9001:2015 NGO DARPAN

खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये

कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार




नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं

समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था

मोबाईल नं. 9503310568

पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर


# स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या कार्याचा जिल्हा शल्यचिकित्सकांकडून गौरव



**अक्कलकोट (कटूसत्य वृत):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुनियोजित उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आल्याने न्यासाचा परिसर हा विकास कामाने फुलून गेले असल्याचे मनोगत जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. वर्षा डोईफोडे (सिव्हील सर्जन) यांनी व्यक्त केल्या.

त्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आल्या असता कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. अशोकराव राठोड, डॉ. बाबासाहेब सुलतानपुरे, डॉ. निरज जाधव, मेट्रन विजयमाला बेले, डॉ. निखील क्षीरसागर, डॉ. गुरुशांत चिंचोळकर, डॉ. सुरेश दुधगी, शंकरराव कुंभार, न्यासाचे पुरोहित विश्वंभर पुजारी, शरणबसप्पा दोडमनी, वैभव मोरे, निखील पाटील, प्रवीण घाडगे, बाळासाहेब घाडगे, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, गोटू माने, शुभम सावंत, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी देशसेवेसाठी योगदान द्यावे : माजी सुभेदार काशीद



**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** मी कारगिल, लडाख आणि इतर युद्धांमध्ये सुभेदार म्हणून सहभाग नोंदविला होता. शिक्षक म्हणूनही काम केले आहे. देशाच्या संरक्षणासाठी सैनिक जीवाची बाजी लावतात. विद्यार्थ्यांनी देश सेवेसाठी योगदान देण्याची गरज आहे, असे आवाहन भारतीय लष्करातील माजी सुभेदार रावसाहेब काशीद यांनी केले.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त आज लिमयेवाडी येथील सोनामाता विद्यालयात माजी सैनिकांसमवेत दिवाळी उपक्रम राबविण्यात आला. १५० विद्यार्थ्यांना फराळ वाटप करण्यात आला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मेजर हणमंत शेट्टी, सरकारी वकील ॲड. शितल डोके, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या जिल्हा उपाध्यक्ष श्रुती गांधी, सोना माता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुवर्णा अत्रे, प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते.

माजी सुभेदार काशीद पुढे म्हणाले, श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने माजी सैनिकांसमवेत दिवाळी हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. याबद्दल समाधान वाटते. प्रतिष्ठानने गेल्या दहा वर्षात सामाजिक बांधिलकी जोपासत विविध कार्यक्रम घेतले. त्यांचे कार्य गौरवास्पद आहे.

श्रीमंतयोगी प्रतिष्ठानच्या 10 व्या वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आजचा हा पाचवा कार्यक्रम घेण्यात आला. प्रतिष्ठानने विद्यार्थी दत्तक योजना, गोरगरीब वंचितांसाठी मदत, वृक्षारोपण, अन्नदान , शालेय साहित्य वाटप, सेनेटरी पॅड वितरण, स्टीलची पाणी टाकी प्रदान यासह अनेक उपक्रम घेतले आहेत, अशी माहिती संस्थापक महेश कासट प्रास्ताविकात दिली.

सुत्रसंचलन रमेश बेडगे यांनी केले तर आभार जयश्री दोडमनी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनूश्री कासट, अक्षता कासट, शिला तापडिया, शुभांगी लचके, प्रियंका जाधव, अर्चना बंडगर, संतोष अलकुंटे, अभिजित व्हनकळस, सुरेश लकडे, रेखा फुलारी, अनुराधा जोशी, विजया चव्हाण, राजुदास पवार, अनिल पांढरे, सारिका पवार, जगदेवी कांबळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी 84 कोटीची मदत खात्यावर जमा होणार - आ. आवताडे



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे . यामध्ये मका, सूर्यफूल, बाजरी, टोमॅटो, मिरची, कांदा, भुईमुग, उडीद, दोडका डाळिंब पेरू या पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला होता त्या शेतकऱ्यांना सरकारने मदतीचा हात दिला असून पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात 88 हजार 505 शेतकऱ्यांच्या खात्यावर 84 कोटी 45 लाख रुपये नुकसान भरपाई जमा होण्यास सुरुवात झाली असून दिवाळीपूर्वी सर्व नुकसानभरपाई खात्यावर जमा होणार असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

यंदाच्या खरिपामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते या संकटाशी सामना करण्याचे बळ देण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना धीर देऊन परिस्थिती जाणून घेत मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही अशी ग्वाही त्यांनी शेतकऱ्यांना देत आपल्या कार्यालयातील स्वीयसहाय्यकांचे संपर्क क्रमांक शेतकऱ्यांसाठी खुले करत पंचनामासाठी अधिकाऱ्यांनी अडचण आणली तर संपर्क साधण्याचे आवाहन केले होते मंगळवेढा तालुक्यातील बोराळे व मारापुर मंडल मध्ये पर्जन्यमापक यंत्रात बिघाड झाल्यामुळे तेथील पाऊस कमी दाखवल्याने या मंडल चा नुकसान भरपाई मध्ये समावेश होण्याच्या अशा धूसर झाल्या होत्या मात्र संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क करून पर्जन्यमापकाच्या बिघाडामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून देत आकडेवारी मध्ये सुधारणा करून मारापूर व बोराळे मंडलचाही या नुकसानीमध्ये आमदार समाधान आवताडे यांनी समावेश करत तेथील शेतकऱ्यांनाही दिलासा दिला आहे या अतिवृष्टीमुळे शेतातील उभ्या पिकांचे, घरांच्या झालेल्या नुकसानीमुळे सर्व ठिकाणचे जनजीवन विस्कळित झाले होते अशा सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून अधिकारी पंचनामे करत होते अद्याप काही ठिकाणचे पंचनामे सुरूच आहेत अनेक विहिरीची पडझड झाली आहे त्यांनाही मदत मिळणार असून त्याची प्रक्रिया पंचायत समितीकडे देण्यात आलेली आहे पंढरपूर तालुक्यात 28 हजार 775 बाधित शेतकरी असून त्यांना 26 कोटी 45 लाख रुपये मदत जाहीर झाली असून मंगळवेढा तालुक्यातील 59 हजार 730 शेतकऱ्यांना 58 कोटी रुपये मंजूर झाले असून आजपासून हे पैसे त्यांच्या खात्यावर जमा होतील. सतत पाठपुरावा करून शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी रात्रंदिवस अधिकाऱ्यांना कामाला लावले त्यामुळेच शेतकऱ्यांची दिवाळी गोड होण्यास मदत होईल याचे समाधान वाटते असे आमदार समाधान आवताडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.


**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

संपर्क : डी. बी. शिंदे

मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३

पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला


# सांस्कृतिक सेल प्रमुखपदी मयुरी बाबर यांची नियुक्ती




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कला, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मयुरी विश्वनाथ बाबर यांची अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक सेल सोलापूर जिल्हा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचा पत्र प्रदान करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

ही नियुक्ती अखिल भारतीय काँग्रेस सहप्रभारी एस. एन. संदीप यांच्या संमतीने तसेच सोलापूर जिल्हा प्रभारी मोहन जोशी यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या हस्ते मयुरी बाबर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

बैठकीत जिल्हा काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडीच्या प्रतिनिधी तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना अध्यक्ष सातलिंग शटगार म्हणाले, 'मयुरी बाबर यांनी विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांतून तरुण पिढीला प्रेरणा दिली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्यातील सांस्कृतिक चळवळीला नवसंजीवनी मिळेल,' असे मत त्यांनी व्यक्त केले.

मयुरी बाबर यांनी या नियुक्तीबद्दल काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले. 'कला आणि संस्कृती हे समाजजागृतीचे प्रभावी माध्यम आहे. सोलापूर जिल्ह्यातील कलाकारांना व्यासपीठ मिळावे, स्थानिक संस्कृतीचा प्रचार व्हावा आणि तरुणाईला या क्षेत्राकडे आकर्षित करावे, हेच माझे ध्येय आहे,' असे त्या म्हणाल्या.

# सोलापूर शहर परिसराचा पारा ३५.१ अंश सेल्सिअसवर



सोलापूर (कटूसत्य वृत):- सोलापूर शहर व जिल्ह्यात सध्या ऑक्टोबर हीटची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाचा चटका आणि उकाडा यामुळे सोलापुरातील नागरिक हैराण होत आहेत. सोलापूर शहर व परिसरात आज (शुक्रवार) ३५.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. अतिवृष्टी आणि महापूर ओसरल्यानंतर तापमानाचा पारा ३३ ते ३४ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहात होता. आज पहिल्यांदा सोलापूरचे तापमान ३५ अंश सेल्सिअस पार झाले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून तापमानात वाढ होताना आढळली आहे. सोलापुरात बुधवारी ३३.६ तर गुरुवारी ३४.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मध्यंतरी सोलापुरात किमान तापमानाचा पारा २० अंश सेल्सिअसपर्यंत गेल्याने वातावरणात गारवा व थंडी सुरू झाली होती.

आता कमाल तापमानासोबत किमान तापमानाचाही पारा वाढल्याने रात्री वातावरणातील गारवा व थंडी घटली आहे. त्यामुळे ऑक्टोबर हीटचा त्रास दिवस व रात्री अशा दोन्ही वेळा होऊ लागला आहे. सोलापुरात दिवाळीनंतर थंडी जाणवण्यास सुरवात होते.

यावर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत उन्हाचा कडाका कायम राहील, वातावरण उष्ण व उकाडा राहील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटचा समाजोपयोगी उपक्रम




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट चे अध्यक्ष लायन अभय खोबरे यांच्या अध्यक्षतेखाली काजी कणमुस येथील हनुमान मंदिर परिसरात गरजू बांधवांसाठी समाजोपयोगी व हृदयस्पर्शी उपक्रम पार पडला.

या अंतर्गत ८५ गोर-गरीब, वंचित व अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांना ह्लायन शिधा कीटह्व वाटप करण्यात आले. अतिवृष्टीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या कुटुंबांना दिलासा देणारा हा उपक्रम समाजात आदर्श ठरला.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भूमीपूत्र माजी सरपंच व माजी कृषी उत्पन्न बाजार समिती चेअरमन प्रभाकर मजगे उपस्थित होते. तसेच यावेळी गौरीशकर मजगे, सोसायटी चेअरमन धोंडीबा कुंभार, उपसरपंच दत्तात्रय मुनाळे, पोलीस पाटील नारायण बंधीछोडे, दीपक मटाळे, मेजर कमलाकर कांबळे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली तसेच गावातील वरिष्ठ, मायबाप व वडीलधारी मंडळी उपस्थित होती.

कार्यक्रमाची प्रास्तावना लायन शिवशरण खुबा यांनी केली, खजिनदार लायन विटरल तेली यांनी व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडली,तर आभार प्रदर्शन लायन मटाळे यांनी केले.

# पूरग्रस्त नागरिकांसाठी आरोग्य केंद्रास मोफत औषध पुरवठा



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी- राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख यांच्या वतीने माढा तालुक्यातील पूरग्रस्त नागरिकांसाठी चार महिने पुरतील व 20 हजारांहून अधिक लोकांना उपयोगी ठरतील इतका मोफत औषध पुरवठा आज खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आमदार अभिजीत पाटील यांच्या उपस्थितीत माढा ग्रामीण रुग्णालय येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.आरती पाटणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. पूरग्रस्त भागातील लोकांना अनेक मदतीचा ओघ असताना पुराच्या पाण्यामुळे पूरग्रस्त गावातील लोकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते या गोष्टीची जाणीव ठेवून 20 हजारांहून अधिक नागरिकांना पुरतील इतका औषध साठा देण्यात आला.

यावेळी आमदार अभिजीत पाटील म्हणाले की,आमचे सहकारी सुरज देशमुख यांनी पूरग्रस्त भागातील लोकांचे आरोग्य या पुराच्या पाण्यामुळे धोक्यात येऊ शकते हे ओळखून 20 हजारांहून अधिक लोकांची या मोफत औषधांच्या माध्यमातून काळजी घेतली आहे. त्यांचे हे सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे. मदत नव्हे कर्तव्य या भावनेतून त्यांनी कायमच सामाजिक भान जपले आहे.

सुरज देशमुख म्हणाले की, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आमदार अभिजीत पाटील यांनी पुर परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत मदतीचा ओघ कायम ठेवला. आपण ही समाजाचे देणे लागतो या भावनेतून पुराच्या पाण्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे हे पाहून तालुक्यातील पूरग्रस्त गावातील 20 हजारांहून लोकांना तीन-चार महिने पुरतील इतका मोफत औषध साठा आज तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केला आहे. भविष्यात ही कोणत्याही नैसर्गिक संकटात आपण लोकांसाठी मदतीची भावना ठेवून सेवा करणार आहे.

यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख संजय कोकाटे, मा.जि.प.सदस्य भारत शिंदे यांनीही मनोगत व्यक्त करत या सामाजिक कायार्चे कौतुक केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, रविंद्र पाटील,बाळासाहेब ढवळे-पाटील, महिला जिल्हाध्यक्षा सुवर्णा शिवपूजे, युवती जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष राम मस्के,वैद्यकीय अधीक्षक डॉ.मेमाने यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.